भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(सकाळ)

जा.क्र. ५४७/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक ०२/०८/२०१७

**१) घराचे समोरील दाराचा कुलुप तोडुन कपाटातील सोन्या, चांदीचे साहित्य वापरते कपडे व नगदी पैश्याची चोरी . :—**

दिनांक २८/०७/२०१७ चे १२.३० वा ते ३१/०७/२०१७ चे २२.३० वा. दर. यातील फिर्यादी विनीत खिमेस मेश्राम वय २९ वर्ष, रा. शिवाजी नगर धोटी पोल्ट्री तुमसर याचे घराचे समोरील दाराचा लावलेला कुलुप कोणीतरी अज्ञात चोराने घरातील कपाटात ठेवलेली सोन्याची नथ वजन ५ ग्रॅम, चांदीचे पाच सिक्के व नगदी १०,०००/—रु. पाच जुन्या वापरत्या साडया, दोन पॅन्ट असा एकुण २०,२००/—रु. चा माल चोरुन नेल्याने फिर्यादी यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन तुमसर येथे कलम ४५७,३८० भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सपोनि. मस्कर पो.स्टे. तुमसर हे करीत आहेत.

**२) टॅक्ट्ररचे हायड्रोलीक लिप्टचे पट्टे व चैन चोरुन नेल्याने गुन्हा नोंद . :—**

दिनांक २७/०७/२०१७ चे १०.३० वा. २८/०७/२०१७ चे १८.०० वा. दर. यातील फिर्यादी नरेन्द्र रामचंद्र रघुते वय ४६ वर्ष, रा. कुर्झा याने आपल्या मालकीचे ट्रॅक्टर क्र. एमएच ३६ एल ५०७१ हा गावातील पंढरी रघुते यांचे घराचे खुल्या जागेत उभा ठेवला असता कोणीतरी अज्ञात चोराने कुणीही नसल्याची संधी साधुन पाहुण उभ्या असलेल्या टॅक्ट्ररचे हायड्रोलीक लिप्टचे पट्टे व चैन किमती ९,५००/—रु. चा माल चोरुन नेल्याने आज पावतो शोध घेतला असता मिळुन न आल्याने फिर्यादी यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन पवनी येथे कलम ३७९ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. साखरे पो.स्टे. पवनी हे करीत आहेत.

**३) संगनमत करुन चांदीचे ब्रसलेटची चोरी . :—**

दिनांक २८/०७/२०१७ चे २०.०० वा. दर. यातील फिर्यादी निखी भास्करराव लेदे वय ३२ वर्ष, रा. पटेलपुरा वार्ड भंडारा याने न्यु लेदे ज्वेलर्स या दुकानातुन दोन अनोळखी आरोपीतांनी येवुन चांदीचा ब्रेसलेट घ्यायचा आहे असे बोलल्या वरुन फिर्यादीने चांदीचे ब्रसलेट दाखवीले असता यातील २ अनोळखी आरोपी इसमांनी फिर्यादीची नजर चुकवुन १ चांदीचा ब्रसलेट किंमती ५,०००/—रु. माल चोरुन नेल्याने फिर्यादी यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ३७९,३४ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. काटेखाये पो.स्टे. भंडारा हे करीत आहेत.

**४) एसबीआय बॅक खात्यातुन पैसे काढुन ऑनलॉईन फसवणुक केल्याने गुन्हा नोंद . :—**

दिनांक २९/०७/२०१७ चे ११.३३ वा. दर. यातील आरोपीने फिर्यादीचे मोबाईल क्रमांकावर फोन करुन एसबीआय बेलापुर बॅकेचा मॅनेजर बोलत असल्याचे सांगुन फिर्यादीस आधार कार्ड, पॅन कार्ड क्र. एटीएम वरील १६ अंकी क्रमांक सा. व्ही. व ओ. टी.पी क्र. असे मागीतले वरुन फिर्यादीने सदरची माहिती आरोपीस फोनवर दिल्याने आरोपीने फिर्यादीचे दोन्ही खात्यावरुन ऑनलाईन फसवणुक करुन एसबीआय खातातुन मधुन ५०,०००/—रु. तसेच दुसऱ्या खातातुन ४५,०००/—रु. असा एकुण ९५,०००/—रु. फिर्यादीचे सम्मतीचे शिवाय फसवणुक केल्याने फिर्यादी यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन जवाहरनगर येथे कलम ४१९,४२०,१७० भादंवि. सहकलम ६६(ड)माहिती तंत्रज्ञान अधिनीयम २००० अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सपोनि. नेवारे पो.स्टे. जवाहरनगर हे करीत आहेत.

५) संगनमत करुन सार्वजनिक जाण्या येण्याच्या रस्ता बांधकामाच्या कारणावरुन अश्लिल शब्दात शिवीगाळ करुन अॅक्ट्रसिटी मध्ये फसवण्याची धमकी दिल्याने गुन्हा नोंद . :—

दिनांक २८/०७/२०१७ चे १४.०० वा. दर. यातील आरोपीतांनी संगनमत करुन फिर्यादीचे सार्वजनिक जाण्या येण्याच्या रस्त्यावरुन बांधकाम करुन अडथळा निर्माण केल्याने फिर्यादी सोबत भांडण करुन अश्लिल शब्दात शिवीगाळ केली व अॅक्ट्रसिटी मध्ये फसविण्याची धमकी दिल्याने फिर्यादी छगनलाल धनीराम कुंभलवार वय ४९ वर्ष, रा. पोहरा यांचे लेखी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन लाखनी येथे कलम ३४१,२९४,५०६,३४ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. सार्वे पो.स्टे. लाखनी हे करीत आहेत.

६) अंधारात आपले अस्तित्व लपवुन दखलपात्र गुन्हा करण्याच्या इरादयाने मिळुन आल्याने गुन्हा नोंद . :—

दिनांक ०१/०८/२०१७ चे ०१.०० वा. ते ०१.३० वा. दर. यातील आरोपी हा अंधारात स्वत:चे अस्तित्व लपवुन सायकल न पळुन जात असता त्यास पकडुन विचारपुस केली असता उडवाउवीचे उत्तर देवुन दखलपात्र गुन्हा करण्याच्या इरादयाने जातांना मिळुन आल्याने पोलीस स्टेशन लाखांदुर येथे कलम १२२ मपोका. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोना. मुंजमकर पो.स्टे. लाखांदुर हे करीत आहेत. आरोपी अटक आहे.

७) नॉयलॉन रस्याने गळफास लावुन इसमाचा मृत्यु . :—

दिनांक ३०/०७/२०१७ चे १३.३० वा. पासुन ते ०१/०८/२०१७ चे १६.४५ वा. पर्यत. यातील मृतक अनिल गणपत भाजीपाले वय ३५ वर्ष, रा. पिंपळगाव सडक याने नॉयलॉन रस्याने पिंपळगाव नाल्याला लागुन असलेल्या झुडपी जंगला मधील एका सागवनाचे झाडाला नॉयलॉनचा रस्सा बांधुन त्या रस्याने गळफास लावुन मरण पावल्याने फिर्यादी विजय गणपत भाजीपाले वय ३६ वर्ष, रा. पिंपळगाव यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन लाखनी येथे कलम १७४ जाफौ. प्रमाणे मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. कोसरे पोलीस स्टेशन लाखनी हे करीत आहेत.

८) दारूच्या नशेत वाहन चालवीतांनी मिळुन आल्याने गुन्हा नोंद :—

दिनांक ०१/०८/२०१७ चे २०.०० ते २०.२५ वा. दर. यातील आरोपी चालकाने त्याचे ताब्यातील वाहन क्र. एमएच. ४० एएस ७०५० ही दारू पिवुन दारूचे नशेत चालवीतांनी मिळुन आल्याने त्याचे ब्रिथ अल्कोहोल अॅनालायझर मशिन द्वारे चेक केले असता अल्कोव्होलचे प्रमाण मिळुन आल्यानेसरतर्फे फिर्यादी पोउपनि. ऊबाळे यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम १८५,(१) मोवाका. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोना. गजभिये पो.स्टे. भंडारा हे करीत आहेत.

१०) अवैध दारु अडयावर धाडी . :—

दिनांक ०१/०८/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पो स्टे भंडारा व अडयाळ येथे अवैध दारू अडयावर धाडी घालुन एकुण ०२ गुन्हे दाखल करून २३ लिटर हा.भ. दारू किंमती २३००/—रु. चा माल जप्त करण्यात आला आहे.

८) मोटार वाहन कायदयाखाली कारवाई. :—

दिनांक ०१/०८/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायदयाखाली एकुण १०६ प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून अवैध प्रवासी ०३, तीन सिटर वाहनांवरती १५ केसेस व तसेच ईतर वाहनांवरती ८८ केसेस करण्यात आलेल्या आहे.

02.8

(एस. व्ही. कुलकर्णी )
पोलीस उपअधिक्षक (गृह)
भंडारा
दुरध्वनी.क्र. ९९८७३८५४०५

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.